**शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग,**

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७

ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune .com

जा.क्र. शिउसं/प्राथ-२०२/मान्यता/पुवि/२०२१/ 4823 दिनांक : 29 OCT 2021

प्रति,

अध्यक्ष/सचिव,कन्नड संघ, गणेशनगर, एरंडवणा, पुणे

विषय :- महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शेक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून स्वयंअर्थसहाय्यीत तत्वावर नविन शाळा सुरु करण्यासाठी परवानगी देणेबाबत

संदर्भ **१. इरादापत्र क्रमांक एसएफएस-१०२१/प्र.क्र. १०६/एसएम-२, दिनांक २८.७.२०२१**

**२. मान्यतापत्रक्रमांक एसएफएस-१०२१/प्र.क्र. १०६/एसएम-२ दिनांक २०.१०.२०२१**

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत कन्नड संघ, गणेशनगर, एरंडवणा, पुणे या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून डॉ.कलमाडी शामराव हायस्कूल, मौजे बाणेर, ता. हवेली जि. पुणे (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ ली ते इ. १२ वी सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) ही स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नविन शाळा सुरु करणे कामी अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम-२०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ कन्नड संघ, गणेशनगर, एरंडवणा, पुणे संचलित डॉ.कलमाडी शामराव हायस्कूल, मौजे बाणेर, ता. हवेली जि. पुणे (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ ली ते इ. १२ वी सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) स्वयंअर्थसहाय्यीत शाळेचे बांधकाम सुरु करणेकरिता अटी व शर्तीसह संदर्भ क्रमांक १ अन्वये महाराष्ट्र शासनाने इरादापत्र दिले होते. आता सदर शाळा सुरु करण्यासाठी शासनाने संदर्भ क्र. २ अन्वये मान्यता दिलेली असून या कार्यालयाची सदर संस्थेस पुढील अटी व शर्तीच्या अधिन राहून शाळा सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. अटी व शर्ती :

१. प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी बालकांचा मोफत व सक्तीचा अधिनियम २००९ या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/तरतुदींची पूर्तता करणे आवश्यक आहे. संस्थेने शाळा सुरु करण्यासाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात बदल करता येणार नाही.

२. पात्र ठरलेल्या संबंधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम २००९ मधील तरतुदींची पूर्तता करुन सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात परवानगी देण्यात येत आहे. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणाव्यतिरित अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रदद समजण्यांत येईल.

३.ज्या व्यवस्थापनास सन २०२१-२२ शाळा स्थापन करण्यासाठी शासन निर्णयाव्दारे पात्र पाठविण्यास शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असणा-या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर, त्यांना सदर बाबींची पूर्तता करणेसाठी शासन निर्णय दिनांकापासून परवानगी मिळालेपासून १८ महिन्याचे आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास परवानगी आपोआप रद्द ठरेल.

४.सी.बी.एस.ई, आय.सी.एस.ई, आय बी.आय.जी. एस. ई व सी.आय.ई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नीत होण्यासाठी इच्छूक व्यवस्थापनास/ शैक्षणिक संस्थेस पात्र ठरवून परवानगी दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय २० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वकष धोरणानुसार नाहरकत प्रमाणपत्र मिळणेसाठी प्रथम मान्यतेनंतर सदर शासन निर्णयातील अटी व शर्तीची पूर्तता केल्यानंतर शासन मंडळ संलग्नतेसाठी नाहरकत प्रमाणपत्र देईल.

५.दर्जावाढ परवानगी दिलेल्या शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमीत होणा-या आदेशांचे, कार्यपध्दतीचे तसेच महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे. त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.

६. .परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे/कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार, अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन/ मुख्य अधिनियम २०१३) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

७. शाळेने अधिनियमन २००९ मधील तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील. शाळा इमारतीचे दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहितीकरिता स्वयं अर्थसहाय्यीत तत्वावरील परवानगी पात्र नविन शाळा/ वर्ग असे दर्शविणारे फलक लावणे बंधनकारक आहे.

८. महाराष्ट्र शाळा स्थापना विनियमन अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

९. यु-डायस डाटा शासन निर्णयाव्दारे महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना माहिती भरतांना स्वयंअर्थसहाय्यीत शाळा/ वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे संबंधित संस्थेवर बंधनकारक राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी मा.राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

१०. महाराष्ट्र शासन बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ च्या पोट नियम (४) नुसार मानके सदरची शाळा पूर्ण करत आहे.

११. शासनाने सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करील अशा नियमांची अंमलबजावणी करणे संस्थेस बंधनकारक राहील.

१२. शासन निर्णय दिनांक १३ डिसेंबर २०१३ व दिनांक २८ ऑगस्ट २०१५ नुसार संस्थेस संच निश्चिती करणे बंधनकारक राहील.

१३. अशी तरतुद करण्यात आली आहे की, स्वयंअर्थसहाय्यीत शाळैतील शिक्षण व शिक्षकेतर कर्मचा-यांची भरती शासनाचे प्रचलित नियमानुसार व विनियमानुसार करण्यात यावी.

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यीत शाळा (स्थापना व विनियमन) नियम २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून कन्नड संघ, गणेशनगर, एरंडवणा, पुणे संचलित डॉ.कलमाडी शामराव हायस्कूल, मौजे बाणेर, ता. हवेली जि. पुणे (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ ली ते इ. १२ वी सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) स्वयं अर्थसहाय्यीत वरील अटी व शर्तीच्या अधिन राहून शाळा सुरु करण्यास या कार्यालयाकडून मान्यता देण्यात आलेली आहे.

(औदुंबर उकिरडे)
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग पुणे-१.**

प्रत : माहितीस्तव सविनय सादर

१. मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे तथा अध्यक्ष, राज्यस्तरीय प्राधिकरण
२. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे
३. कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय,मुंबई,मुंबई-३२.
४. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे